<table>
<tr><td rowspan="2"></td><td colspan="3">HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE, KOLHAPUR<br>An ISO 9001:2015 Approved Institute</td><td rowspan="2">NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA<br>NHM<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान<br>महाराष्ट्र</td></tr>
<tr><td>Principal<br>Telephone No.(p)<br>Office Telephone No.</td><td>2693480</td><td>Principal, Health & Family Welfare Training Centre Kolhapur<br>RK Nagar Road, Shenda Park, Kolhapur 416 012.<br>Email : hfwtc.kop1@gmail.com</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">Health Services, Govt. of Maharashtra<br>https://arogya.maharashtra.gov.in</td><td colspan="2">No.HFWTC/NHM/QuotationNotice/2687/2026<br>Dt.27/02/2026</td></tr>
</table>

# जाहिर सुचना

**विषय :- कपडा धुलाई/इस्त्री सेवा (Laundry Service) पुरवठा दरपत्रक सादर करणेबाबत...**

आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर या संस्थेमध्ये सन २०२६-२७ कालावधीमध्ये वस्त्र धुलाई व इस्त्री सेवा पुरविणेकरीता मान्यता प्राप्त व इच्छुक स्थानिक पुरवठादारांकडून दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे दरपत्रके मागवणेत येत आहेत.

**मुख्य लखोटयामध्ये खालीलप्रमाणे साक्षांकीत कागदपत्रे क्रमवार सादर करणेची आहेत:-**

१) सिलबंद व्यापारी लखोटा
२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र **किंवा** शॉप ॲक्ट प्रमाणपत्र **किंवा** उद्यम आधार प्रमाणपत्र.
३) GST रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट.
४) GST रजिस्ट्रेशन लागू नसलेस चॅर्टर्ड अकौन्टट् यांचे लेटरहेडवर सही व शिक्क्या-निशी GST रजिस्ट्रेशन लागू नसलेचे सर्टीफिकेट. (टॅक्स कन्सल्टंट चे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही)
५) आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन कार्ड).
६) प्रपत्र-अ प्रमाणे दरपत्रकाराचे हमी पत्र.

**व्यापारी लखोटा:-**

पुरवठादाराने खालीलप्रमाणे पुरवठादाराच्या लेटरहेडवर दरपत्रक तयार करुन सिलबंद व्यापारी लखोटा सादर करावा.

<table>
<tr><th rowspan="2">Sr. No.</th><th rowspan="2">Item Name</th><th rowspan="2">Rate quantity</th><th rowspan="2">Basic Rate</th><th colspan="2">GST</th><th rowspan="2">Total Rate</th></tr>
<tr><th>Percentage</th><th>Amount</th></tr>
<tr><td>1</td><td>बेडशीट सिंगल</td><td>१ नग</td><td colspan="4" rowspan="11">पुरवठादाराने त्याच्या लेटरहेडवर संगणकीकृत दरपत्रक तयार करुन सही व शिक्यानिशी सादर करावे.</td></tr>
<tr><td>2</td><td>बेडशीट डबल</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>3</td><td>ब्लॅन्केट सिंगल</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>4</td><td>ब्लॅन्केट डबल</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>5</td><td>उशी कव्हर</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>6</td><td>चादर सिंगल</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>7</td><td>खिडकीचा पडदा</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>8</td><td>नॅपकीन</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>9</td><td>टॉवेल- लहान</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>10</td><td>टॉवेल- मोठा</td><td>१ नग</td></tr>
<tr><td>11</td><td>गाडीचे सीट कव्हर</td><td>१ सेट</td></tr>
</table>

| Sr. No. | Item Name | Rate quantity | Basic Rate | GST | | Total Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Percentage | Amount | |
| 12 | मच्छरदाणी सिंगल | १ नग | | | | |

*दरांच्या पत्रकामध्ये दिनांक नमुद करुन सही व शिक्का लावून एका लखोटयामध्ये घालून सदर लखोटा सिलबंद करावा व त्यावर संस्थेच्या नावाचा शिक्का लावून "व्यापारी लखोटा" असा उल्लेख करावा.*

*नोटीसीमधे नमुद केलेली सर्व कागदपत्रे साक्षांकीत करुन व वरील सिलबंद व्यापारी लखोटा दुसऱ्या लखोटयामध्ये घालायचा आहे व तो सिलबंद करायचा आहे (हा झाला मुख्य लखोटा).*

*मुख्य लखोटयावर " Quotation for Laundry Service" असा उल्लेख करुन तो "Principal, Health & Family Welfare Training Centre, Kolhapur" यांचे नांवे सादर करायचा आहे व मुख्य लखोटयाच्या मागील बाजूस संस्थेचे नाव, पत्ता, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी लिहायचा आहे.*

इच्छुक पुरवठादारांकडून खालील अटी व शर्तीस अधिन राहून कमीत कमी दराचे सिलबंद दरपत्रक दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

***अटी व शर्ती:-***

१) आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी दुरध्वनी संदेशाद्वारे धुलाईबाबत कळविले जाईल. ठेकेदाराने कार्यालयामधून धुलाईच्या वस्तू नेऊन धुलाई व इस्त्री करुन कार्यालयामध्ये पोहोच करणेचे आहे.

२) सदर दरपत्रक कार्यादेश दिल्यापासून दि.३१/०३/२०२७ पर्यंत ग्राहय राहिल.

३) मक्तेदाराकडून धुलाईची वस्तू गहाळ झाल्यास अथवा फाटल्यास त्याची रक्कम देय बिलातून वसूल करण्यात येईल.

४) करांमध्ये वाढ झाल्यास वस्तुच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

५) पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रद्द करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादित घालनेची कारवाई केली जाईल.

६) देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे महिनाअखेरीस SNA-SPARSH / PFMS / Treasury-CMP द्वारे अदा करणेत येईल. तसेच प्रत्येक बिलातून नियमाप्रमाणे टी.डी.एस. ची रक्कम कपात करणेत येईल.

७) काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रद्द करणेचा अधिकार मा.प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वा/-
प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर

## दरपत्रकधारकांनी तांत्रीक कागदपत्रांमध्ये द्यावयाच्या हमीपत्राचा नमुना

**प्रपत्र–अ**

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. सदर जाहिर सुचनेमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

दरपत्रकाराची सही व
संस्थेचा शिक्का